**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २३ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

**1. आखाती देशांमध्ये युद्ध सुरू असताना देशातल्या नागरिकांनी एकजूट राहण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन**

**2. भोंदूबाबा अशोक खरातशी संबंध असलेल्या सर्वांवर कारवाई करण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधीमंडळात आश्वासन**

**3. केंद्र सरकारच्या धोरणांविरुद्ध महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज नागपुरात संयुक्त मोर्चा**

**आणि**

**4. ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पवनार इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

**-----------**

**पंतप्रधान - आखाती देश**

आखाती देशांमध्ये युद्ध सुरू असताना देशातल्या नागरिकांनी एकजूट रहावं आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. या मुद्द्यावर त्यांनी आज लोकसभेत निवेदन केलं. देशातला पेट्रोल, डिझेल आणि गॅस पुरवठा प्रभावित होऊ नये यासाठी सरकार शक्य तिथून इंधनाची खरेदी करत आहे. तेल, गॅस, खतांसाठी आवश्यक सामान घेऊन येणारी जहाजं देशात सुरक्षित येण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. या युद्धामुळं भारतासह जगातल्या सर्व देशांसमोर संकट उभं राहिल्याचं त्यांनी सांगितलं

युद्धाचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी सरकार कटीबद्ध आहे. यासाठी शेतकऱ्यांना शक्य ती सर्व मदत करत राहू असं ते म्हणाले. लोकांना युद्धाची कमीत कमी झळ बसावी यासाठी सरकारनं गेल्या काही वर्षात केलेल्या प्रयत्नांची माहिती

दिली. त्याचवेळी काळाबाजार, साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी सर्व राज्य सरकारांना केलं.

**हुतात्मा दिन**

संसदेच्या दोन्ही सदनात आज क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना हुतात्मा दिनानिमित्त आदराजंली अर्पण करण्यात आली. या वीरांनी त्यांच्या लहान वयातच देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान दिलं असून, त्यांचं शौर्य, साहस आणि निस्सीम देशभक्तीमुळे स्वतंत्र भारताचा पाया रचला गेला, अशा शब्दात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना नमन केलं. भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांचं हौताम्य हा स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातला केवळ एक अध्याय नव्हे, तर या बलिदानानं राष्ट्राच्या अंतरात्म्याला जागृत करण्याचं आणि लाखो लोकांना इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध पेटून उठण्याची प्रेरणा दिली असल्याचं राज्यसभेत सभापती सी पी राधाकृष्णन यांनी नमूद केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना आदरांजली वाहिली. या क्रांतीकारकांच्या अदम्य साहसाला आणि बलिदानाला त्यांनी नमन केलं.

**विधिमंडळ**

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात ज्यांचा दुरान्वयेही संबंध असेल त्याला सोडले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिला. घडलेला विषय हा अत्यंत गंभीर असून खरातने दिशाभूल करून अनेक महिलांची फसवणूक केली आहे. हा राजकारणाचा विषय नसून महिलांच्या 'सन्माना'चा विषय असल्याचं सांगतानाच या प्रकरणी उद्या सभागृहात सविस्तर निवेदन देणार असल्याचही मुख्यमंत्री फडणविस यांनी सांगितलं. त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. या भोंदूबाबाशी अनेक अधिकारी आणि मंत्र्यांचेही संबंध होते. या सर्वांचे राजीनामे घेऊन त्यांना सहआरोपी करा, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली. यामुळे महाराष्ट्राची बदनामी झाली आहे, असं ते म्हणाले. नाना पटोले आणि भास्कर जाधव यांनीही याचा पुनरुच्चार केला. या विषयावर सभागृहात अल्पकालीन चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली. मात्र ही मागणी अध्यक्षांनी फेटाळून लावली. यानंतर शिवसेनेच्या आमदारांनी हौद्यात उतरून गदारोळ केला. या गदारोळातच महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक मांडण्यात आलं.दरम्यान भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर काल रात्री नाशिकच्या

सरकारवाडा पोलिसांनी तिसरा गुन्हा दाखल केला. एका 33 वर्षाच्या पीडितेनं त्याच्या विरोधात तक्रार केल्यानंतर विशेष चौकशी पथकाकडून नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हा शाखेनं त्याला ताब्यात घेतलं आणि त्याची चौकशी केली.

**अजित पवार अपघात**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात कसा झाला याबद्दल लोकांच्या मनात शंका असून याचं सत्य जनतेसमोर आलं पाहिजे असं आमदार चेतन तुपे विधानसभेत २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेत बोलताना म्हणाले. दृश्यमानता कमी असूनही विमान का उतरवलं गेलं, विमानात अतिरिक्त इंधन का भरलं होतं, ब्लॅक बॉक्स पूर्णपणे कसा जळाला, सुरक्षा तपासणी करण्यात आली होती का ? असे प्रश्न तुपे यांनी उपस्थित केले. या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळायला हवीत. मात्र प्रशासन आणि पोलीस, तपासात हलगर्जीपणा करत आहेत असा आरोप त्यांनी केला.

**अश्विनी वैष्णव**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज भारताच्या मीडिया, प्रसारण आणि डिजिटल क्षेत्राला बळकटी देण्यासाठी तसंच सर्जनशील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ केला. Indian Institute of Creative Technologies यांच्या माध्यमातून Google आणि YouTube यांच्या भागीदारीत राष्ट्रीय एआय कौशल्य विकास उपक्रम; WAVES OTT वरील नागरिक निर्मात्यांसाठी 'MyWAVES' हा प्लॅटफॉर्म; तसंच दूरदर्शन संचांमध्ये प्रगत इलेक्ट्रॉनिक कार्यक्रम मार्गदर्शक आणि इन-बिल्ट सॅटेलाइट ट्यूनर्सची अंमलबजावणी, यांचा या उपक्रमात समावेश आहे. 'ऑरेंज इकॉनॉमी'ला प्रोत्साहन देणे, सार्वजनिक प्रसारण व्यवस्था मजबूत करणे आणि मीडिया व मनोरंजन क्षेत्रासाठी एआय कौशल्य असलेलं मनुष्यबळ तयार करणे ही या उपक्रमामागील प्रमुख उद्दिष्ट्य आहेत.

**काँग्रेस-वंचितचा मोर्चा**

"एपस्टिन फाईल" प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका घ्यावी, या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज नागपुरात संयुक्त मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात प्रकाश आंबेडकर आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी

झाले होते.मोर्चा रिझर्व्ह बँक चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालय, महाल परिसरापर्यंत काढण्याची योजना होती. मात्र पोलिसांनी परवानगी नाकारल्यामुळे नेत्यांच्या भाषणानंतर झिरो माईल्स परिसरात मोर्चाचा समारोप करण्यात आला. यावेळी नरेंद्र मोदी, केंद्र सरकार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. सहभागी कार्यकर्त्यांच्या हातात सरकारविरोधी आणि संघविरोधी घोषणांचे फलक दिसून आले. मोर्चाच्या सुरुवातीला प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थितांना संबोधित करत केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. त्यानंतर हर्षवर्धन सपकाळ यांनीही सरकारवर निशाणा साधत, परदेशातील घडामोडींवर पंतप्रधान मोदी गप्प का आहेत, असा सवाल उपस्थित केला.मोर्चादरम्यान काही वक्त्यांनी भारताचे सार्वभौमत्व धोक्यात आल्याचा आरोप करत सरकारवर टीका केली. तसेच पंतप्रधानांविरोधात विविध दावे करण्यात आले असून, त्या संदर्भात स्पष्टीकरण मागण्यासाठीच हा मोर्चा आयोजित करण्यात आल्याचं आयोजकांनी सांगितलं. याशिवाय, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही टीका करत केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मोर्चा शांततेत पार पडला असून शहरात कोणतीही अनुचित घटना घडली नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**दत्ता मेघे**

ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर आज पवनार इथल्या त्यांच्या शेतात शासकीय इतमानाने अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत. यावेळी मोठ्या संख्येने त्यांचे चाहते आणि जनसमुदाय उपस्थित आहे तत्पूर्वी नागपुरातील त्याच्या स्वगृही आणि नंतर सावंगी मेघे इथं त्यांचं पार्थिव अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आलं. मेघे यांचं काल सायंकाळी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झालं. बी.ए. शिक्षणानंतर त्यांनी एलआयसीमध्ये डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून कारकीर्द सुरू केली. साध्या कार्यकर्त्यापासून सार्वजनिक जीवनाची सुरुवात करत त्यांनी युवक कॅडरच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेतली. त्यांच्या कार्याची दखल घेत शरद पवार यांनी १९७८ मध्ये त्यांना थेट मंत्रिमंडळात स्थान दिलं .दत्ता मेघे यांनी राज्यात चार वेळा मंत्रीपद भूषवलं तसंच विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहिलं. १९९१ मध्ये ते नागपूर लोकसभा मतदारसंघातून खासदार झाले आणि त्यानंतर रामटेक आणि वर्धा येथूनही निवडून आले. ते राज्यसभेचे सदस्यही होते आणि शेवटची निवडणूक वर्धा येथून मोठ्या मताधिक्याने जिंकली होती. शिक्षण क्षेत्रात त्यांनी विदर्भात शाळा आणि महाविद्यालये उभारून हजारो विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली.

## हवामान दिवस

आज जागतिक हवामान दिनानिमित्त नागपूर प्रादेशिक हवामान केंद्रात हवामान उपकरणांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. "आजचे निरीक्षण, उद्याचे संरक्षण" या संकल्पनेला अनुसरून हवामान खात्यासंदर्भात थ्रीडी मॉडेल्स, प्रात्यक्षिक आणि विविध यंत्र आणि उपकरणांचं हे प्रदर्शन सर्वांसाठी खुलं असेल. या प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या उपकरणांची माहिती वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी दिली आहे -

*****